


पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

७६ वर्ष
स्नेह, विश्वास आणि परंपरेचे

www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com




■ वर्ष ७६ वे/अंक ५७ वा ■ ■ अमरावती,बुधवार,दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर २४ आश्विन १९४७ ■ ■ पृष्ठे १२ ₹ ४.०० ■




## झेडपीमध्ये ५ अन् पंचायत समितीमध्ये २ स्वीकृत सदस्य घेणार? : बावनकुळे



मुंबई दि. १४ : जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांतर्गत जिल्हा परिषदेत ५ आणि पंचायत समितीमध्ये २ सदस्यांची स्वीकृत सदस्य म्हणून नेमणूक करण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमात सुधारणा करण्यात यावी, अशी विनंती राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. मुख्यमंत्र्यांनी या विषयावर सकारात्मक प्रतिसाद देत ग्रामविकास विभागाला कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे, या सुधारणेनंतर ग्रामविकासात्मक प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी समाजाभिमुख कार्यकर्त्याला मिळेल, असा विश्वास देखील बावनकुळे यांनी व्यक्त केला. दरम्यान, सरकारने हा निर्णय लागू केल्यास नगरपालिका, महापालिका यांप्रमाणे झेडपी अन् पंचायत समितीमध्येही स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा होणार आहे.

जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकांतर्गत जिल्हा परिषदेतील ५ आणि पंचायत समितीमधील ०२ सदस्यांची स्वीकृत सदस्य म्हणून नेमणूक करण्यासाठी अधिनियमात सुधारणा करण्याबाबत निर्णय *(उर्वरित पान २ वर)*

## खाजगी बसला भीषण आग १२ प्रवाशांचा होरपळून मृत्यू



जयपूर दि. १४ : राजस्थानातील जैसलमेर येथे आज (१४ ऑक्टोबर) एक धक्कादायक घटना घडली आहे. प्रवाशांनी भरलेल्या बसला आग लागली आहे. यामध्ये १० ते १२ जणांचा मृत्यू झाल्याची भीती आहे. बस जैसलमेरहून जोधपूरला जात होती.यावेळी बसला आग लागल्याची घटना घडली. या बसमध्ये एकूण ५० हून अधिक प्रवासी असल्याची माहिती मिळत आहे.

**बसच्या पुढच्या सीटवर बसलेल्या प्रवाशांना बाहेर पडण्यात यश**

दरम्यान, बसच्या पुढच्या सीटवर बसलेल्या प्रवाशांना बाहेर पडण्यात यश आलं आहे. परंतू, मागच्या सीटवर बसलेले लोक भाजले आहेत. या जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बसमधील १५ प्रवासी गंभीररित्या भाजले गेले आहेत आणि त्यापैकी १० ते १२ जणांचा मृत्यू झाल्याची भीती आहे. यामध्ये तीन मुले आणि चार *(उर्वरित पान २ वर)*

## '...तर पाकिस्तान उद्ध्वस्त झाला असता : ले. जनरल राजीव घई



नवी दिल्ली दि. १४ : भारतीय लष्कराचे उपप्रमुख राजीव घई यांनी ऑपरेशन सिंदूरबाबत एक मोठा खुलासा केला आहे. राजधानी दिल्लीत आयोजित चीफ कॉन्क्लेव मध्ये णछझघऋदेशांच्या लष्कर प्रमुख आणि उच्च लष्करी कमांडर्सच्या उपस्थितीत ऑपरेशन सिंदूरवर ऑडिओ-व्हिडिओ सादरीकरण करण्यात आले. यावेळी जनरल घईंनी संसद हल्ला, उरी, पुलवामा आणि पहलगाम हल्ल्याचा संदर्भ देत पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा सर्वांसमोर आणला.

जनरल घईंनी म्हटले की, ऑपरेशन सिंदूरच्या वेळी केवळ लष्कर आणि वायुसेनाच नाही, तर नौदलही अरब सागराच्या मार्गाने हल्ल्यासाठी पूर्णपणे सज्ज होते. जर पाकिस्तानने *(पान २ वर)*

## बाबासाहेबांची शिक्षणसंस्था ते शेतकऱ्यांसाठी मोठे पाऊल मंत्रिमंडळ बैठकीत ३ सर्वात मोठे निर्णय, राज्याचा चेहरामोहराच बदलणार



मुंबई दि. १४ : राज्य मंत्रिमंडळाची आज महत्त्वाची बैठक पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. या बैठकीत अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. विशेष म्हणजे याच बैठकीत तीन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. उद्योग विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, विधी व न्याय विभाग या तीन महत्त्वाच्या विभागांसाठी हे निर्णय घेण्यात आले आहेत. *(पान २ वर)*

## भारत जगातील सर्वात मोठा एआय हब बनणार

नवी दिल्ली दि. १४ : सध्या एआयचा काळ आहे, आगामी काळात एआयचा वापर आणखी वाढणार आहे. अशातच आता जगातील आघाडीची टेक कंपना गुगल भारतात मोठी गुंतवणूक करणार आहे. कंपनीचे सीईओ सुंदर पिचाई म्हणाले की, 'भारताला एआय हब बनवण्यासाठी कंपनी भारतात १.३३ लाख कोटींची गुंतवणूक करणार आहे.' याबाबत पिचाई यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशीही चर्चा केली आहे. *(उर्वरित पान २ वर)*

## नक्षल्यांचा नेता 'भूपती'सह ६० जणांनी पोलिसांसमोर केले आत्मसमर्पण

गडचिरोली दि. १४ : महाराष्ट्र-छत्तीसगड सीमावती भागातील दंडकारण्यात गेली अनेक वर्षे माओवादी चळवळीचा चेहरा राहिलेला वरिष्ठ नेता मल्लोजुला वेणुगोपाल ऊर्फ भूपती ऊर्फ सोनू अखेर गडचिरोली पोलिसांसमोर भामरागड येथे शरण आला. तब्बल ६० सहकाऱ्यांसह त्याने आत्मसमर्पण केल्याची खळबळजनक माहिती १४ ऑक्टोबरला सकाळी समोर आली आहे. यासंदर्भात गडचिरोली पोलिसांनी अधिकृत माहिती दिली नाही, पण १६ ऑक्टोबरला मुख्यमंत्री व पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समोर शस्त्र खाली ठेऊन तो हाती संविधान घेणार असल्याचे खात्रीशीर सूत्रांनी सांगितले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत माओवाद मूळासकट संपवू अशी *(उर्वरित पान २ वर)*







■ www.dainikhindusthan.com ■ फोन : २६६०४२९/२६६६४६४ ■ फॅक्स ०७२१-२६६३३६० ■ इ-मेल : dainikhindusthanpress@gmail.com ■ आर.एन.आय.क्र. ११४२०/५७ ■ पोस्टल रजि.नं. ए.एमटी./आर.एन.पी./८५/२०१८-२०२० ● अमरावती ● यवतमाळ ● अकोला ● बुलढाणा ● वाशिम